# प्रस्तावना

भारतामध्ये दलीतांची लोकसंख्या सुमारे पंधरा टक्केच्या जवळपास आहे. त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येमध्ये ह्या लोकांचा भरणा सर्वात अधिक आहे. त्याशिवाय दलीत समाजात सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक दृष्टया मागासलेला आहे. स्वातंत्र्य मिळून चाळीस वर्षांचा काळ लोटला असतानाही दलीतांच्या परीस्थिती-मध्ये फारसा बदल झालेला नाही. जाती व्यवस्थेमुळे निर्माण झालेली विषमता ही आपल्या समाजापुढील जटील समस्या आहे. ही समस्या सोडविण्यासाठी आजपर्यन्त प्रयत्न झाले, परंतु म्हणावे तेवढे यश अद्याप पदरात पडलेले नाही. ग्रामीण भागात सहज लक्षात येते, की पूर्वाश्रमीच्या अस्पृष्य वर्गाला आजही बरोबरीच्या नात्याने वागवण्यास विरोध होताना दिसतो. गावातील सार्वजनिक विहरीवर दलीतांना पाणी भरू देण्यासाठी मामुली सुधारणादेखील सर्वत्र मान्यता पावलेली नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळात जे प्रयत्न झाले ते प्रामुख्याने समाज - सुधारकांनी केले, त्यात सरकारी यंत्रणेचा सहभाग फारसा नव्हता, या प्रयत्नात लोकांचे प्रबोधन कांही विधायक कार्य आणि आंदोलने लढे या मार्गाचा समावेश होता, परंतु प्रामुख्याने भर प्रबोधनावरच होता. त्याचा परिणाम अपेक्षेच्या मानाने खूपच कमी झालेला - दिसतो. कांही मुठभर सुशिक्षीत लोकांवर समतेच्या विचारांचा - प्रभाव पडला परंतु बहूसंख्य लोकांच्या बाबतीत समतेचा विचार रूजण्यात अपयश आले. विशेषत: ग्रामीण भागात या विचाराचे लोन पोहोचवता आले नाही. आणि तेथील सधन सवर्ण लोक आजही जुन्या विचारांना चिकटून राहिलेली दिसतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा नेता दलित वर्गातून = निर्माण झाल्याने समतेच्या लढयाला एक नवीन दिशा आणि जोम

मिळाला. तसेच दलीत लोकांमध्ये जागृती निर्माण होऊन ते संघटित रित्या जुन्या समाज व्यवस्थेवर प्रहार करू लागले. ही एक हितकारक घटना मानायला हवी कारण त्यामुळे वरच्या वर्गावर दडपण येऊन = त्यांना जाग येऊ लागली, परंतु या ही चळवळीचे यश मर्यादित म्हणावे लागेल कारण या लढयाचे फायदे खेडयातील दलीतांना अजुनही मिळालेले नाहीत.

स्वातंत्र प्राप्तीनंतर संविधान आणि इतर कायदे यामध्ये सामाजिक समतेचे तत्व अंतर्भूत करण्यात आले परंतु समाजाने या तत्वाचा मोकळ्या मनाने स्विकार केला नाही. त्यामुळे कायदे कागदावरच - राहिले. कायधाची अंमलबाजावणी करण्यास शासन यंत्रणा असमर्थ ठरली. दलीत समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक उध्दारासाठी केंद्र तथा राज्य सरकारने ग्रामीण विकास धोरणांतर्गत अनेक योजना आखल्या त्यामध्ये प्रामुख्याने दलीत सहकारी शेती दलीत सहकारी शेती दलीत सहकारी पाणी पुरवठा योजना जीवनधारा, दलीत गृहनिर्माण संस्था इत्यादी सारख्या योजनांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे दलीतांचा स्वयंरोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र सरकारने अनेक पंचवार्षिक - योजनांमध्ये तशा प्रकारची योजना आखली. मार्गदर्शक तत्वांच्या - पूर्ततेसाठी आणि समाजातील कमजोर वर्गाच्या उन्नतीसाठी राज्य - सरकारने वेळोवेळी कांही विशेष योजनांचा आंतर्भाव केला. या संपूर्ण कार्यक्रमात योजना राबवण्याच्या दृष्टीकोनातून राज्य सरकार तथा केंद्र सरकार यांनी सेवाभावी संस्था, सरकार. सहकारी चळवळ या साधनांचा उपयोग करून घेण्याची अपेक्षा व्यक्त केली.

भारतातील सहकारी चळवळ प्रामुख्याने राज्याच्या प्रोत्साहनाने ग्रामीण भागातील श्रीमंत वर्गाच्या पुढाकाराने फोफावली या चळवळीचा मुख्य उद्देश ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडवून आणून ग्रामीण - भागाचा एकात्मक विकास साधणे हा होता. आज हीच चळवळ ग्रामीण भाग अनेक पातळीवर काम करते. उदा सहकारी खरेदी विक्री, सहकारी बँका सहकारी साखर कारखाने इत्यादी क्षेत्रामध्ये काम करते, परंतु हया चळवळीतून त्या विकासाची फळे केवळ ग्रामीण भागातील कांही मोजक्याच लोकाना मिळाली. हया विकासातून दलीत तथा भूमिहीन शेतमजूर बाहेर वंचितच राहिला. हया लोकांना न्याय मिळावा म्हणून सरकारने वेगवेगळ्या सहकारी चळवळीची आवश्यकता चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये नमूद केली. या पार्श्वभूमिवर म्हैशाळ येथे मधूकरराव देवल यांच्या पुढाकाराने विठ्ठल संयुक्त सहकारी शेती ही दलीतांची - सामुदायिक शेतीची योजना पुढे आली हया दलीत सामुदायिक शेतीच्या प्रयत्नाच्या संदर्भात अनेक अभ्यासकांनी आपले निष्कर्ष काढले. या अभ्यासात प्रामुख्याने वसंतराव देशपांडे, डॉ. वि. गो. म्हेत्रस, राधिका चोप्रा, डॉ. राजेंद्र. पाटील, प्रा. गौतमीपूत्र कांबळे या अभ्यासकांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

वसंतराव देशपांडे यांनी आपल्या अभ्यासामध्ये विठ्ठल सामुदायिक शेती संस्थेची जे पुढील उद्दीष्टे होती ती खालीलप्रमाणे -

१] अस्पृश्यांना संघटित करून त्यांच्याकडून उत्पादक कार्यक्रम राबवून घेणे.

२] त्यातून आर्थिक ताकद वाढविणे.

३] या आर्थिक बळाच्या आधारावर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय प्रगती साधणे.

४] व्यावसायिक आणि व्यवस्थापकीय कौशल्ये त्यांना आत्मसात करावयास लावून त्यांचे कर्तृत्व बहराला आणणे.

५] कर्तृत्वाच्या जाणिवेतून त्यांना स्वाभिमान संपन्न करणे.

६] कर्तृत्व जातीवर अवलंबून नाही, असा धडा सवर्णांना देऊन त्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे पाहण्याचीही दृष्टी सर्वस्वी नवी आहे हे सहजच ध्यानात येईल.

" म्हैसाळ प्रकल्पाला प्रारंभ झाला दुध व्यवसायापासून त्या साठी चाकोरी बाहेर खटपट करावी लागली. पुढे गहाण जमिनी सोडवून त्यात ही अडचणी होत्याच परंतु केवळ आर्थिक स्वावलंबनावर प्रकल्प थांबला नाही. आर्थिक स्वावलंबन प्राप्त होत असतानाच एकात्मता साध्य करण्या-साठी आवश्यक ते प्रबोधन व उपक्रम हाती घेण्यात आले. त्यामुळे दलीत आणि दलीतेतर यामधील दरी न रुंदावता ती निदान कांही प्रमाणात तरी संकुचित झाली सुमारे दहा वर्षाचा काळात मिळालेले हे यश स्पृहणीय आहे. वसंतराव देशपांडेंच्या मताप्रमाणे म्हैसाळ प्रकल्पामध्ये दलीतांची आर्थिक - प्रगती होऊन त्यांच्यामध्ये आर्थिक स्वावलंबन आले. त्याचप्रमाणे त्यांच्या असे निदर्शनास आले की अस्पृश्यता बाबतचे संबंध सुधारलेले दिसून आले. त्यांना असे वाटते कि, म्हैसाळ गावातील अस्पृश्यता पूर्णपणे नाहीशी झाली. देशपांडे यांचा दावा आहे कि, अस्पृश्यता निवारणाच्या प्रयत्नात सोसायटी च्या यशस्वी वाटचालीमुळे मोठी चालना मिळाली. देशपांडे पुढे म्हणतात या विठ्ठल सोसायटीमुळे विशेषत: दूध सोसायटीमुळे गावातील दलीतेतर व इतर समाज एकत्र आला अशात-हेने गावातील सामाजिक एकात्मतेच्या प्रयत्नात सोसायटीमुळे चालना मिळाली. देशपांडे आणखी एक महत्वाचा मुददा मांडतात कि, म्हैसाळ्यापासून सांगली जिल्ह्यातील कवठेपिराण, नांद्रे,

या गावातील दलीत कुटूंबांनी, प्रेरणा घेऊन याच धर्तीवर सामुदायिक शेती सोसायटी प्रकल्प सुरु केले.

विठ्ठल सहकारी सोसायटीने पुढाकार घेऊन स्त्रियांची प्रेगती व देवदासी प्रथा या प्रश्नासंबंधी सुध्दा प्रयत्न केले. परंतु या देवदासी प्रथा पूर्णपणे बंद करण्यात यश आले नाही असे ही वसंत देशपांडे म्हणतात. ते आपल्या अभ्यासात विठ्ठल सोसायटीच्या कांही सभासदांच्या तक्रारी ही नोंदवतात.

१] सोसायटीचे व्यवस्थापन आधिक कार्यक्रम व डोळस झाले पाहिजे.

२] शेतीची कार्यक्षमता म्हणावी तशी वाढली नाही.

अशाप्रकारची सभासदांची खंत ही नोंदवतात परंतु एकूणच देशपांडे यांनी विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीच्या दलीत सभासदांच्या आर्थिक, सामाजिक उन्नतीबद्दल आणि देवलांच्या भूमिकेबद्दल प्रशंसा केलेली आहे.

विठ्ठल सोसायटीच्या संदर्भात दूसरे महत्वाचे अभ्यासक डॉ. वि.गो.म्हेत्रस हे होत त्यांनी सोसायटीच्या संदर्भात दोन अहवाल सादर केले आहेत. त्यापैकी पहिला अहवाल स्त्रियांच्या जीवनावरती आहे. त्यामध्ये डॉ. म्हेत्रस यांनी असे दाखवून दिले कि अभ्यास केलेल्या सात स्त्रियांची कुटूंबापैकी बहूतेक सर्वाची आर्थिकउन्नती झालेली आहे. या सात स्त्रियांच्या कुटूंबांनी जवळजवळ सत्तर हजारांची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक त्यांची विठ्ठल सोसायटी स्थापन झाल्यानंतर झाली असे ते आपल्या अहवालात म्हणतात.

पुढे दुस-या अहवालात डॉ. वि.गो.म्हेत्रस यांनी बारा पुरुष कुटूंबांचा अभ्यास केला. त्यात त्यांनी असे दाखवूनव दिले की, विठ्ठल

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सोसायटीच्या स्थापनेमध्ये या कुटूंबांची एकूण जवळजवळ एक लाख बावन्न हजारांची मिळकत वाढली व उत्पन्नाची साधने सुध्दा वाढली असे स्पष्टपणे म्हेत्रस यांनी दूस-या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे.

या म्हैशाळ प्रकल्पावरती तिसरे अभ्यासक राधिका चोप्रा या होत त्यांनी आपल्या अभ्यासात प्रकल्पा विषयी असे मत मांडले आहे की " म्हैशाळ सोसायटीमुळे दलीतांना सामाजिक दर्जा प्रस्थापित करण्याचा एक महत्वाचा उपक्रम व आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग मिळाला" त्याचप्रमाणे पुढे असेही म्हणतात कि, " सोसायटीला अडचणीतून जावे लागते एक म्हणजे मधूकरराव देवल सारख्या उच्च जातीच्या - मनुष्याने पुढाकार घेतला व तो दलीतांनी मान्य केला व दुसरा म्हणजे दलीतांना गावात सामाजिक दर्जा उंचावण्याच्या प्रयत्नात इतर सर्वांचा प्रतिसाद परंतु या दोन्हीही गोष्टी साध्य झाल्याचा दावा त्या करतात.

म्हैशाळ प्रकल्पावरती अभ्यास करणारे चौथे अभ्यासक म्हणजे डॉ. राजेंद्र पाटील हे होत त्यांनी आपल्या अभ्यासात असा निष्कर्ष काढला आहे कि, विठ्ठल सहकारी शेती संस्थेने म्हैशाळच्या दलीतांच्या सामाजिक, आर्थिक जीवनात महत्वाचे बदल घडवून आणले आहेत ते पुढे म्हणतात की विठ्ठल संयुक्त सहकारी शेती स्थापनेनंतर दलीतांची पूर्वी होणारी उपासमार व गरीबी दूर होवून दलीत आता चांगले जीवन जगत आहेत त्यांना उपजिविकेचे साधन दूध डेअरी व सामुदायिक शेतीच्या रुपाने उपलब्ध झाले असल्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढले आहे. डॉ राजेंद्र पाटील पुढे म्हणतात दलीतांच्या आर्थिक जीवनात प्रगती झाल्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जासुध्दा उंचावलेला आहे. गावातील लोक त्यांना

चांगले लेख लागले आहेत. सर्वसामान्यपणे विठ्ठल संस्थेचे दोन पैलू पाटील सांगतात एक म्हणजे विठ्ठल संयुक्त सहकारी सोसायटीमुळे दलीत आर्थिक दृष्टया स्वयंपूर्ण झाले आहेत, या आर्थिक उन्नतीमुळे दलीतांना गावामध्ये प्रतिष्ठा लाभली आहे व त्यांचा स्वाभिमान वाढला, दुसरे म्हणजे विठ्ठल संयुक्त सहकारी शेती संस्थेमुळे दलीतांना हिंदूच्या बरोबरीने समाजात - सामाजिक दर्जा मिळाला आहे.

डॉ. राजेंद्र पाटील पुढे म्हणतात दलीतांचा आर्थिक फायदा झाल्यामुळे संस्थेबद्दल दलीतांचा विश्वास वाढला आहे परंतु या विकासा-बरोबरच दलीतांमध्ये कांही वाईट प्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत, त्या म्हणजे सामुदायिक शेतीवर मन लावून काम करण्याचा अभाव आहे. तसेच पाटलांचे असे म्हणणे आहे की सहकारी शेतीच्या प्रयोग करून वैयक्तीक नफा ही देत अशा प्रकारची वृत्ती दलीतांमध्ये निर्माण झाली आहे.
या म्हैशाळ प्रकल्पावर चिकित्सक पध्दतीने प्रत्यक्ष दलीत वस्तीत जाऊन प्रश्नावलीच्या माध्यमाने पहाणी करून कांही गावातील विरोधी गटातील लोकांशी भेटून चर्चा करून निष्कर्ष काढलेले अनुभव जन्य अभ्यासक प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांनी आपली मते प्रकल्पाविषयी स्पष्टपणे दैनिक नवशक्तीमध्ये मांडलेली आहेत. त्यांनी म्हैशाळ प्रकल्पावरती जवळजवळ दहा ते अकरा लेख [ दैनिक नवशक्ती [मुंबई] १९८५] प्रसिध्द केले आहेत. त्यामध्ये प्रा. गौतमीपुत्र कांबळे म्हणतात कि " डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंधश्रध्देतून दैववादातून, सामाजिक विषमतेतून मुक्त होण्यासाठी ज्या परंपरेने संस्कृतीचे आणि धर्माने अस्पृश्यांना अमानुषपणे वागविले ती संस्कृती व धर्म बाबासाहेब आंबेडकरांनी फेकून देऊन बौध्द धर्माचा स्विकार केला परंतु याच्या उलट म्हैशाळ प्रकल्पाने आपली ताकद एकवटून त्याच जुन्या संस्कृतीचे आणि

धर्माचे संरक्षण करण्याचा प्रयत्न चालू ठेवला आहे. ज्या संस्कृतीने आणि धर्माने अस्पृश्यांना साधे माणूसकीचे अधिकार नाकारले असे स्पष्टपणे कांबळे विचार मांडतात. प्रा. गौतमीपुत्र कांबळे पुढे म्हणतात -
" आंबेडकरांनी चळवळीचा वारा ही म्हैशाळ येथील सोसायटीच्या दलीतांना लागू द्यायचा नाही अशी चोख व्यवस्था प्रकल्पातील प्रवर्तकानी व सहका-यांनी चालविलेली आहे "

प्रा. कांबळे असे ही म्हणतात " डॉ. आंबेडकर यांची विचार प्रणाली, आंबेडकरी संघटना, नेते, यांच्या संबंधी विकृत विचार पसरवून दलीतांची केली जाणारी दिशाभूल आहे. " वरील सर्व प्रकारची माहिती प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांनी प्रत्यक्ष म्हैशाळच्या दलीत वस्तीत जाऊन दलीतांची पाहणी करुन मुलाखतीद्वारे, प्रश्नावलीच्या माध्यमाने मिळविली व आपले निष्कर्ष काढले. वरील अभ्यासकांपैकी प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांनी प्रकल्पाविषयी वेगळी भूमिका मांडली आहे वसंतराव देशपांडे डॉ. वि.गा. म्हेत्रस, राधिका चोप्रा. डा. राजेंद्र पाटील या चार अभ्यासकांच्या अभ्यासामध्ये प्रामुख्याने म्हैशाळ प्रकल्पामधील दलीतांचा आर्थिक, सामाजिक विकास केल्याबददलची एक वाक्यता दिसून आली. परंतु हया सर्व अभ्यासकांनी म्हैशाळ प्रकल्पाचा अभ्यास सन १९८४ पर्यन्तचा अभ्यास केलेला होता त्यानंतर सन १९८५ मध्ये प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांनी चिकित्सक पध्दतीने अभ्यास केला आहे. त्यांनी म्हैशाळ प्रकल्पावर टिका केली आहे.

आज बदलत्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीमुळे विठ्ठल संयुक्त शेती सोसायटीच्या उददेशाविरुध्द म्हैशाळ कांही भागात घडलेले आहे. त्याचप्रमाणे बदलत्या वास्तवामुळे वरील अभ्यासकांची निष्कर्ष तपासून पाहणें

गरजेचे होते, म्हणून खालील प्रश्नांच्या बदलत्या परिस्थितीमध्ये पुन्हा विचार व्हावा म्हणून म्हैशाळ सामुदायिक शेतीचा प्रकल्प एक पुर्नविचार हा प्रबंध विषय घेण्यात आला.

प्रबंधाची उद्दिदष्टे :-

१] विठ्ठल संयुक्त शेती सोसायटी स्थापन करीत असताना जे दलीतांच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीचे उद्दिदष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले होते ते उद्दिदष्ट वरील अभ्यासक म्हणतात त्याप्रमाणे पूर्ण झाले काय ?

गावामध्ये दलीत दलीतेतर सामंजस्य निर्माण झाले काय ? गावातून अस्पृश्यता वसंतराव देशपांडे सांगतात त्याप्रमाणे नाहीशी झाली काय ?

२] हरितक्रांतीच्या प्रक्रियेत शेतीच्या संबंधी जीवनमूल्ये बदलतात. सामाजिक मुल्ये ही बदलतात त्यांच्या जाणिवा बदलतात. विठ्ठल - सोसायटीच्या स्थापनेमुळे जे देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे दलीत शेतीच्या शेतीचे आधुनिकीकरण झाले त्या आधुनिकीकरणाचा परिणाम दलीतांच्या जाणिवा बदलण्यात झाल्यामुळे झाला का ? हा प्रश्न वरील अभ्यासकांनी हाताळलेला दिसत नाही, म्हणून दलीतांचे आधुनिकीकरण व त्याचा दलीतांच्या जाणिवावर झालेला परिणाम तपासण्याचा दुसरा महत्वाचा हेतू आहे.

३] तिसरा महत्वाचा उद्देश वरील चार अभ्यासकांनी असे नमूद केले आहे की म्हैशाळच्या दलीत विकासामध्ये देवलांचा महत्वाचा वाटा आहे आणि हे जरी खरे असले तरी देवलांनी दलीतांचे शेतीचे आधुनिकीकरण व त्यांच्या जाणिवा ह्यासंबंधी देवलांच्या मनात कोणता आकृतीबंध होता हे शोधण्याचे तिसरे महत्वाचे उद्दिदष्ट आहे.

४] या प्रकल्पामुळे दलीतांचा ग्रामीण लोकशाही संस्थामधील निर्णय घेण्यामध्ये कितपत सहभाग वाढला व त्याचे स्वरुप काय ?

५] शेवटी या म्हैशाळ दलीतांच्या संदर्भात व संपूर्ण दलीत मुक्तीच्या संदर्भात या प्रकल्पाचे मुल्यांकन करणे.

प्रस्तुत प्रबंध पूर्ण करण्याच्या दृष्टीने माहिती गोळा करण्यासाठी एक प्रमुख अडचण पुढे आली ती म्हणजे सुरुवातीला ५०% सँपल घेऊन प्रश्नावली तयार केली त्या प्रश्नावलीनुसार सभासदांना प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला परंतु बहूतेक सभासद एक सारखीच उत्तरे देत होती. त्यामुळे - सोसायटीच्या संदर्भात ऑब्जेटिव्ह माहिती गोळा करणे कठिण होऊन बसले. म्हणून हे सर्व टाळण्यासाठी व अधिका अधिक खरी माहिती मिळविण्यासाठी गावात जाऊन जवळजवळ तीन महिने राहून सभासदामध्ये मिसळून

सोसायटीच्या कारभाराचा व सभासदांच्या जाणिवांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला हे करीत असताना सभासदांशी अनौपचारिक पध्दतीने संबंध प्रस्थापित करण्यात यश आले. या सभासदामध्ये वयोगटानुसार वृध्द मध्यम व तरुण अश गटातील लोकांशी चर्चा करुन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला.

प्रबंधासाठी माहिती गोळा करण्यासाठी सरकारी अहवाल, कागदपत्रे सोसायटीचे वार्षिक अहवाल त्याचप्रमाणे म्हैशाळ प्रकल्पावर लिहीलेल्या अभ्यासकांची पुस्तेके, नियतकालीके, वृत्तपत्रे इत्यादी दुय्यम साधनांचा सुध्दा वापर करण्यात आला. माहिती गोळा करण्यासाठी मे १९८९ ते ऑगष्ट १९८९ एवढा तीन महिन्याचा अवधी लागला अभ्यासाचा कालावधी १९८५ ते १९८९ एवढा घेण्यात आला कारण १९८५ पर्यन्त या विषयावर निर्दर्शित केलेल्या अभ्यासकांचे अभ्यास प्रकल्पावर उपलब्ध होते.